**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २६२ । शुक्रवार १७ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## 'कोम्बिंग ऑपरेशन'मध्ये
# श्रीरामपूर परिसरातील ७ आरोपी जेरबंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखा, श्रीरामपूर शहर आणि तालुका पोलिसांनी १६ जुलै रात्री ८ ते १७ जुलै च्या पहाटे ५ वाजेपर्यंत संयुक्तपणे कोम्बिंग ऑपरेशन राबवत सात आरोपींना जेरबंद केले. या विशेष मोहिमेत वेगवेगळ्या गुन्ह्यांत हवे असलेले २ आणि न्यायालयाच्या वॉरंटमधील ५ अशा एकूण ७ आरोपींना पोलिसांनी जेरबंद केले.

महेश विष्णू बोराडे (वय २६, रा. उंदिरगाव) आणि नितीन नाना लोखंडे (वय ३१, रा. बेलापूर). महेश कांदळकर (अशोकनगर), अनिल जाधव (बेलापूर), दीपक जाधव (जिनींग प्रेस), नशिर शेख (अशोकनगर) आणि आनंद काळे (रेणुकानगर) यांचा अटक आरोपींमध्ये समावेश आहे. याशिवाय, वॉरंट रद्द केल्याबाबत ६ संशयितांनी पोलिसांसमोर कायदेशीर पावत्या हजर केल्या.

ताब्यात घेतलेल्या सर्व आरोपींना पुढील कारवाईसाठी श्रीरामपूर शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार श्रीरामपूर शहर आणि परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी ही मोहीम राबविली.

# जयंत पाटील उपमुख्यमंत्री शिंदेंच्या भेटीला

**मुंबई । वृत्तसंस्था –** सांगली जिल्ह्यातील उरूण-ईश्वरपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे आणि त्यांचे बंधू सुनील मलगुंडे यांचे पद रद्द करण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी मलगुंडे बंधूंसह राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत भेट घेतली. या भेटीबाबत स्वतः जयंत पाटील यांनी ट्विट करून माहिती दिली.

नुकतेच मुंबईतील वर्षा या शासकीय निवासस्थानी जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांची बंद दाराआड भेट घेतली होती. याच वेळी अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे देखील फडणवीसांना भेटायला पोहोचल्याने राजकीय भूवया उंचावल्या होत्या.

### एनडीएसोबत जाण्याच्या चर्चेला मिळाली बळकटी

**शरद पवार गट एनडीएमध्ये सामील होण्याची चर्चा आहे. मतदारसंघ पुर्नरचना विधेयकाला पाठिंबा देण्याचे सुतोवाच पक्षाकडून करण्यात आले आहेत. दुसरीकडे, शरद पवारांचे अत्यंत विश्वासू असलेल्या जयंत पाटलांच्या भेटीगाठी पाहता एनडीएसोबत जाण्याच्या चर्चेला आणखी बळकटी मिळाली आहे.**

फडणवीस यांच्या भेटीच्या अवघ्या काही दिवस आधी जयंत पाटील यांनी भाजपचे राष्ट्रीय नेते विनोद तावडे यांचीही मुंबईत भेट घेतली होती. एकाच आठवड्यात भाजपच्या दोन अत्यंत वजनदार नेत्यांची (विनोद तावडे आणि नंतर देवेंद्र फडणवीस) जयंत पाटील यांनी घेतलेली भेट ही केवळ योगायोग मानली जात नाही. अजित पवार गटातील नेत्यांसोबत जयंत पाटील यांच्या थेट औपचारिक बैठका झालेल्या नसली, तरी विधानभवनातील एका खोलीत अजित पवार गटाच्या काही आमदारांनी जयंत पाटील यांची भेट घेतल्याची मोठी चर्चा झाली होती.



## व्यवसाय परवाना शुल्कात १६०% वाढीचा प्रस्ताव पाहता
# शहरात सक्षम विरोधी पक्ष असणे किती आवश्यक आहे हे मतदारांनी समजून घ्यावे - किरण काळे
### शुल्क वाढीला ठाकरे शिवसेनेचा विरोध, आक्रमक पवित्रा घेण्याचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेकडून व्यवसाय परवाना शुल्कात तब्बल १६० टक्के वाढ करण्याचा महासभेच्या मंजुरीसाठी प्रशासना कडून सादर करण्यात आलेला प्रस्ताव अत्यंत अन्यायकारक असून दुकानदार, छोटे किरकोळ विक्रेते, व्यापारी विरोधी आणि जनविरोधी आहे. या प्रस्तावाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा तीव्र जाहीर विरोध आहे. पाशवी बहुमता सह एकहाती सत्ता दिल्याचा हा दुष्परिणाम आहे. लोकशाहीमध्ये, नगर शहरात सक्षम विरोधी पक्ष असणे किती आवश्यक आहे, याचे हे जिवंत उदाहरण असल्याचे प्रतिपादन महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे.



मनपा कडून व्यवसाय परवाना शुल्कात तब्बल १६० टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाची धक्कादायक बाब उजेडात आल्यानंतर ठाकरे शिवसेनेने या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. शहरात सुमारे ५० हजार लहान-मोठी दुकाने व व्यावसायिक आस्थापना असून या प्रस्तावामुळे व्यापाऱ्यांवर मोठा आर्थिक बोजा पडणार आहे. काळे म्हणाले, ही तर केवळ सुरुवात आहे. पुढील पाच वर्षांत प्रत्येक घटकाला सत्ताधारी हे हुकुमशाही निर्णय लादून उध्वस्त करतील. राम मंदिरावर पडलेल्या दरोड्यावर मूग गिळून गप्प बसलेले तथाकथित ढोंगी हिंदुत्ववादी सगळ्यांना त्यांच्या राजकीय स्वार्थासाठी एकीकडे जय श्रीरामचा नारा द्यायला लावत आहेत, तर दुसरीकडे स्वकष्टाने व्यापार, स्वयंरोजगारातून पोट भरणाऱ्यांना आर्थिक संकटाच्या खाईत लोटत आहेत.

काळे पुढे म्हणाले, मतदारांनी सभागृहात चुकीच्या निर्णयांना विरोध करण्यासाठी विरोधी पक्षालाही पुरेसे प्रतिनिधित्व दिले असते, तर आज सत्ताधाऱ्यांना असे मनमानी निर्णय घेण्याचे धाडस झाले नसते. जेव्हा सत्ताधाऱ्यांना एकतर्फी प्रचंड बहुमत मिळते तेव्हा सत्तेचा माज वाढतो आणि समाजातील विविध घटकांचे आर्थिक शोषण सुरू होते. आज अहिल्यानगरमध्ये नेमके तेच चित्र दुर्दैवाने सर्वच घटकातील नागरिकांना पहावे लागत आहे. गल्ली ते दिल्ली सत्ता असून देखील महापालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यात सत्ताधारी पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. स्वतःच्या चुकीच्या आर्थिक नियोजनाची, निष्क्रिय कारभाराची आणि अपव्ययाची किंमत आता शहरातील सुमारे ५० हजार व्यापाऱ्यांकडून वसूल करण्याचा हा अघोरी प्रताप सत्ताधाऱ्यांकडून केला जात असल्याचा आरोप किरण काळे यांनी केला आहे.

**तेव्हा २०२३ मध्ये आम्ही हा डाव हाणून पाडला होता :**

सन २०२३ मध्ये देखील हा प्रस्ताव महासभेकडून मंजूर करण्यात आला होता. त्यावेळी आम्ही महापालिकेसमोर दोन दिवसांच धरण आंदोलन केलं. प्रस्ताव पायदळी तुडवत निदर्शन केली. वेगवेगळ्या व्यापारी संघटनांच्या भेटीगाठी घेऊन जनजागृती केली. आमच्यासह बहुतांशी संघटनांनी त्यावेळी या निर्णयाला विरोध केला होता. आम्ही जन आंदोलन उभं करत २०२३ मध्ये तो डाव हाणून पाडला होता. पण नुकत्याच झालेल्या मनपा निवडणुकीत ज्यांनी निवडून देत सत्ताधाऱ्यांना पाशवी बहुमत दिलं तेच आता पन्नास हजार व्यावसायिक, व्यापाऱ्यांच्या मुळावर ■ पान ४ वर

# भगवानबाबा मल्टिस्टेट पतसंस्थेत अडीच कोटींची फसवणुक उघड
### चेअरमनसह ७ जणांविरुध्द गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बुरुडगाव रोड चाणक्य चौकात असलेल्या भगवान बाबा मल्टिस्टेट पतसंस्थेत आणखी एक घोटाळा उघडकीस आला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात ७ जणांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यापुर्वी श्रीरामपुर येथे आणि आणखी एका ठिकाणी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल झाले असून आता या पतसंस्थेतील घोटाळाप्रकरणी तीन स्वतंत्र गुन्हे दाखल झाले आहेत.

पतसंस्थेच्या चेअरमन मंदाकिनी रंगनाथ वैद्य, व्हाईस चेअरमन मयुर रंगनाथ वैद्य, संचालक नितीन सोपान तुपे, शांतीलाल नागनाथ साखरे, राम लक्ष्मण पोपळघट, किशोर अनिल सुरवसे, मुख्य कार्यकारी अधिकारी जयशाली मयुर वैद्य (सर्व रा. बालमटाकळी, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

या संचालकांनी पतसंस्थेतच्या माध्यमातून ठेवीदारांना आकर्षक व्याज देण्याचे आमिष दाखवून नागरिकांना ठेवी ठेवण्यास प्रवृत्त केले. त्यानुसार नागरिकांनीही मोठया प्रमाणात बुरुडगाव रोड येथील चाणक्य चौकात असलेल्या शाखेमध्ये ठेवी ठेवल्या. परंतु सदरच्या ठेवींची मुदस संपल्यावर त्या पुन्हा पैसे घेण्यासाठी नागरिक गेल्यावर त्यांना ■ पान ४ वर

## छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेच्या
# चेअरमनपदी संतोष साबळे; व्हाईस चेअरमनपदी सुधीर उंडे
### सचिवपदी गोटीराम मडके यांची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगरच्या संचालक मंडळाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीत संस्थेच्या नव्या पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यानुसार संतोष कचरू साबळे यांची चेअरमनपदी, सुधीर दशरथ उंडे यांची व्हाईस चेअरमनपदी तर गोटीराम अंकुश मडके यांची सचिवपदी फेर निवड करण्यात आली. निवडीनंतर उपस्थित संचालक व सभासदांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.


(छाया : राजू खरपुडे)

पतसंस्थेच्या संचालक मंडळामध्ये ज्ञानेश्वर देवराम सुर्वे, सदानंद लहानू डोखे, सुधाकर प्रभाकर पगारे, संतोष तात्याबा थिगळे, श्रीकांत बाबासाहेब साळे, सुधीर दशरथ उंडे, संतोष कचरू साबळे, गोटीराम अंकुश मडके, रवि हरीश्चंद्र देशमुख , प्रशांत दशरथ सातपुते, प्रताप हनुमंत साबळे, नवनाथ बारकू गोरे, हरिश शिवराम भालेराव, ज्ञानदेव शिवाजी अडसुरे, किशोर किसनराव जेजुरकर, ■ पान ४ वर

# भर बाजारदिवशी वाहतूक कोंडी; ट्रॅफिक पोलिसांशी वाहनचालकाची हुज्जत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहरात आज बाजारदिवशी सप्तशृंगी हॉटेलसमोर एका वाहनचालकाने भर रस्त्यात वाहन उभे केल्याने काही काळ मोठी वाहतूक कोंडी झाली. या प्रकारामुळे नागरिकांना आणि वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

वाहतूक सुरळीत करण्यासाठी ड्युटीवर असलेले ट्रॅफिक पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि संबंधित वाहनचालकाला वाहन रस्त्याच्या बाजूला घेण्यास सांगितले. मात्र, पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करत वाहनचालकाने त्यांच्याशी हुज्जत घालत वाहन जागेवरून हलविण्यास नकार दिला.

भर बाजारात वाहनचालकाची ही मुजोरी पाहून उपस्थित नागरिकांनी संताप व्यक्त केला. अशा बेशिस्त वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# पंढरीच्या वाटेवर पुन्हा सज्ज सेवाभावाचा महायज्ञ
### परीते येथे १९ ते २२ जुलैदरम्यान नीलेश लंके प्रतिष्ठानचे अन्नछत्र । खासदार नीलेश लंके यांची माहिती । लाखो वारकऱ्यांसाठी अन्नदान, आरोग्यसेवा व विविध सुविधा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर– आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाही सोलापूर जिल्ह्यातील परीते येथे भव्य अन्नछत्र व आरोग्य सेवा केंद्र उभारण्यात येणार आहे. नीलेश लंके प्रतिष्ठान आणि आपला मावळा सामाजिक संघटनेच्या संयुक्त विद्यमाने १९ ते २२ जुलै या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येणार असून, चार दिवसांत सुमारे तीन ते चार लाख वारकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. यासंदर्भातील माहिती खासदार नीलेश लंके यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

यंदा सलग पाचव्या वर्षी हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहे. विठ्ठलभक्तांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत अन्नदानाबरोबरच आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, चहा, नाश्ता आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. वारीच्या मार्गावरून जाणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला आवश्यक त्या क्षणी मदत मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे लंके यांनी सांगितले.



वारकऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेत परीते येथे २५ ते ३० डॉक्टरांचे पथक, प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी आणि रुग्णवाहिका चारही दिवस कार्यरत राहणार आहेत. प्रवासादरम्यान उद्भवणाऱ्या विविध आरोग्य समस्यांवर तातडीने उपचार केले जाणार असून, कोरोना काळात आरोग्य व्यवस्थापनाचा मिळालेला अनुभव या सेवेत उपयोगी पडणार असल्याचे त्यांनी नमूद केले. या संपूर्ण सेवायज्ञासाठी सुमारे ५०० स्वयंसेवक कार्यरत राहणार आहेत. अन्नपदार्थांचे वितरण, पाण्याची व्यवस्था, साहित्याची ने-आण, वारकऱ्यांना मार्गदर्शन, स्वच्छता, वाहतूक नियोजन अशा सर्व कामांची स्वतंत्र जबाबदारी स्वयंसेवकांवर सोपविण्यात आली आहे. विशेष म्हणजे अन्न तयार करण्याव्यतिरिक्त इतर कोणतेही काम कंत्राटदार किंवा केटरिंग व्यावसायिकांकडून करून घेतले जात नाही. प्रतिष्ठानचे कार्यकर्ते आणि स्वयंसेवक स्वतः सर्व कामे निःस्वार्थपणे पार पाडतात. या सेवेकडे आम्ही कधीही राजकारण म्हणून पाहत नाही. येथे मी खासदार म्हणून नव्हे, तर वारकरी आणि त्यांच्या सेवकाच्या भूमिकेत सहभागी होतो. विठ्ठलभक्तांची सेवा करणे हेच आमच्यासाठी सर्वात मोठे भाग्य आहे, असे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.

वारीदरम्यान होणाऱ्या अपघातांबाबत चिंता व्यक्त करताना त्यांनी वारी मार्गावर इतर वाहतुकीस पूर्ण बंदी घालण्याची गरज व्यक्त केली. वारीत सहभागी होणाऱ्या वाहनचालकांच्या परवान्यांची तपासणी, अल्पवयीनांकडून वाहन चालविण्याचे प्रकार रोखणे तसेच प्रत्येक वारकऱ्याचा शासनाने विमा उतरविणे ■ पान ४ वर

# संत वामनभाऊंच्या पालखीचे जामखेडला पहिले गोल रिंगण उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**जामखेड–** जामखेड शहरालगत असलेल्या जमादारवाडी येथील संत वामनभाऊ गड येथे गुरुवारी (ता.१६) दुपारी तीन वाजता संत वामनभाऊ महाराज यांच्या पालखीचे पहिले गोल रिंगण मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

वारकरी संप्रदायाचे मूळ उगमस्थान म्हणून गहिनीनाथ गडाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे या पालखी सोहळ्याला विशेष मानाचे स्थान आहे. गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी श्रीक्षेत्र गहिनीनाथगड येथून संत वामनभाऊ महाराज यांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ झाला.

गहिनीनाथ गड, निवडुंगा, वाहली, सावरगाव, केकानवस्ती, वनवेवाडी,मातकुळी असा प्रवास करत गुरुवारी जामखेड तालुक्यातील जांबवाडी येथे सकाळी दाखल झाली. जामखेड शहरात आगमन होताच, तपनेश्वर येथे श्रीनागेश्वर भजनी मंडळाने टाळ मृदंग विना घेऊन भजन करत सामोरे जाऊन, दिंडीचे स्वागत केले.यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिंडीचे स्वागत करत सहभागी झाले.



दरम्यान शहरात ठिकठिकाणी पालखी मार्गावर सडा रांगोळी काढून महिलांनी स्वागत केले. ठिकठिकाणी वारकऱ्यांना नागरिकांनी फळे, चहा बिस्कीट, नास्ता औषधे, पाणी व्यवस्था केली होती. शहरातील श्रीविठ्ठल मंदिरात श्रीविठ्ठल भजनी मंडळाच्या वतीने दिंडीचे स्वागत करण्यात आले. तेथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर जगदाळेवस्ती येथे पंगत झाली .

जमादारवाडी येथील संत वामनभाऊ मंदिर येथे पालखीचे आगमन झाले. यावेळी जमादारवाडी ग्रामस्थ व पंचक्रोशीच्या वतीने जामखेडचे नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी व अमित चिंतामणी यांच्या हस्ते श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज यांचा सन्मान करण्यात आला व रिंगण सोहळा सुरू झाला. यावेळी आष्टीचे माजी आमदार भिमराव धोंडे तसेच परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मंदिराच्या भव्य प्रांगणात मध्यभागी पालखी रथ उभा करण्यात आला. पताकाधारी वारकरी, विणेकरी टाळ मृदंगाच्या तालावर पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... गहिनीनाथ महाराज की जय, संत वामनभाऊ महाराज की जय , या जयघोषात भरधाव वेगाने पालखीला प्रदक्षिणा ■ पान ४ वर

# दै. आकर्षण निवडक

## दोन महिने उलटले... तरी अकोलेतील विद्यार्थी पाठ्यपुस्तकांपासून वंचित!

अहिल्यानगर- अकोले तालुक्यात शैक्षणिक वर्ष सुरू होऊन जवळपास दोन महिने उलटले तरी अनेक जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना शासनाची मोफत पाठ्यपुस्तके मिळालेली नसल्याचा गंभीर आरोप शिक्षक भारती संघटनेने केला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्काशी संबंधित या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी, अन्यथा शिक्षक भारती तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन उभारेल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. शिक्षक भारतीचे पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी शिक्षणमंत्री, अपर मुख्य सचिव, शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक आणि जिल्हा परिषद अहिल्यानगरचे शिक्षणाधिकारी यांना सविस्तर निवेदन पाठवून अकोले तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेतील गंभीर त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत. संघटनेच्या म्हणण्यानुसार, शासनाचे स्पष्ट धोरण असूनही विद्यार्थ्यांना वेळेत पाठ्यपुस्तके न मिळाल्याने त्यांच्या शिक्षणाचे मोठे नुकसान होत आहे.

## ३६ वर्षे प्रामाणिक सेवा करूनही अपंग शिक्षकाला मानसिक छळ

अहिल्यानगर - अहिल्यानगर तालुक्यातील इसळक येथील डी.सी. मुठे नाईक माध्यमिक विद्यालयातील कर्मचारी डी.सी. मुठे यांनी संस्थेचे अध्यक्ष नितीन भाऊसाहेब कोतकर व सहसचिव अविनाश भाऊसाहेब कोतकर यांच्याकडून गेल्या काही महिन्यांपासून मानसिक व शारीरिक त्रास दिला जात असल्याचा गंभीर आरोप करत माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार डी.सी. मुठे हे गेली ३६ वर्षे विद्यालयात सेवा बजावत असून, जानेवारी २०२६ पासून अध्यक्ष व सहसचिवांकडून सातत्याने त्रास दिला जात असल्याचा दावा त्यांनी केला आहे. ६ जून २०२४ रोजी विद्यालयातील मुख्याध्यापक कार्यालयाचे कुलूप तोडल्याप्रकरणी झालेल्या पोलीस तक्रारीत आपण साक्षीदार असल्याने आपल्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यासाठी वारंवार कारणे दाखवा नोटिसा देऊन मानसिक त्रास दिल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, आपण प्रामाणिकपणे सेवा बजावत असतानाही अपमानास्पद भाषा वापरणे, बदनामी करणे, कामात अडथळे निर्माण करणे तसेच प्रयोगशाळा परिचारक पदाच्या पदोन्नतीसाठी पैशांची मागणी करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पैसे देण्यास नकार दिल्यामुळे पदोन्नती मुद्दाम रोखण्यात आल्याचाही दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

# देवगड संस्थानच्या वतीनेपंढरपूर येथील मठामध्ये अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**नेवासा–** आषाढी वारी निमित्त नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड संस्थानच्या वतीने पंढरपूर येथील मठामध्ये श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा पालखी सोहळयाच्या निमित्ताने राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली अखंड हरिनाम सप्ताह व नामदेव गाथा पारायण सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि.२० जुलै रोजी पंढरपूर येथील मठापासून श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांची पालखी दिंडी पंढरपूर नगरीत क्षेत्र प्रदक्षिणा करण्यासाठी निघणार आहे.

पंढरपूरयेथे होणाऱ्या सात दिवशीय या सोहळयात नामदेव गाथा पारायण व पंढरपूर क्षेत्रप्रदक्षिणादिंडी सोहळयासाठी भाविक हे दि.१९ जुलै रोजीपंढरपूरला जाण्यासाठी आपापल्या वाहनांनी प्रस्थान करणार आहे. दि.२० जुलै रोजी सकाळी ७ वाजता गुरूदेव दत्त पिठाचे महंत राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज व उत्तराधिकारी स्वामी श्री प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरच्या देवगड मठापासून पंढरपूरनगरीत क्षेत्रप्रदक्षिणाकरण्यासाठी श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांची पालखी दिंडी निघणार आहे.



क्षेत्रप्रदक्षिणादिंडीचे हे पाचवे वर्ष आहे क्षेत्र प्रदक्षिणादिंडीचा समारोप रिंगण कार्यक्रमाने मठाच्या प्रांगणात होईल. दि.२१ जुलै पासून नामदेव गाथा पारायण सोहळयास सुरूवात होणार आहे.या सोहळयात सकाळी ४ ते ६ काकडा, आरती, सकाळी ७ ते ८ गीता पठण,९ ते ११ श्री नामदेव गाथा पठण,११ ते १२ भोजन प्रसाद,दुपारी ३ ते ५ श्री नामदेव गाथा पारायण,सायंकाळी ५.३० ते ७ हरिपाठ, आरतीनंतर भोजन, रात्री ८.३० ते १० कीर्तन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे

गाथा पारायण सोहळयासाठी व्यासपीठ प्रमुख देवगडचे संतसेवक हभप नारायण महाराज ससे,हभप गणपत महाराज आहेर,हभप रामनाथ महाराज पवार, हभप संजय महाराज निथळे,मृदुंगाचार्य गिरीजीनाथ महाराज जाधव,बाळू महाराज कानडे, तात्या महाराज शिंदे, लक्ष्मण महाराज नांगरे, रोहित महाराज पटारे,गणेश महाराज तनपुरे,शशिकांत महाराज कोरेकर, सोमनाथ महाराज पानकडे यांच्यासह देवगड संस्थानचे विद्यार्थी मंडळ हे सेवा देणार आहे.

# गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला पद्मशाली सोशल फाउंडेशनचा आधार; १५० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप

### गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समाजाने एकत्र येणे हीच खरी सामाजिक जबाबदारी – इंजि. प्रशांत कोक्कुल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सामाजिक बांधिलकी जपत गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देण्याच्या उद्देशाने पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल येथे शहरातील विविध शाळांमधील १५० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. फाउंडेशनच्या या उपक्रमाचे यंदाचे दहावे वर्ष असून गेल्या दशकभरात तब्बल १,५०० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करून शिक्षणासाठी मोलाची मदत करण्यात आली आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. प्रशांत कोक्कुल, इंजि. अक्षय बल्लाळ, अमित सुंकी, गणेश अवधूत, बाबासाहेब तिपुले, राजू कोडम उपस्थित होते. तसेच पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी, सचिव अजयकुमार लयचेट्टी, उपाध्यक्ष श्रीनिवास बुरगुल, राजेंद्र बुलबुले, वरद लकशेट्टी, ओंकार आडेप, ओंकार जेटला यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले.

प्रमुख पाहुणे इंजि. प्रशांत कोक्कुल यांनी सांगितले की, ''विद्यार्थ्यांच्या हातात शालेय दप्तर देणे म्हणजे केवळ शैक्षणिक साहित्याचे वाटप नव्हे, तर त्यांच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करण्याचे काम आहे. आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आपल्या परीने योगदान देणे आवश्यक आहे. पद्मशाली सोशल फाउंडेशनने गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने राबविलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण आहे.'' शिक्षण हीच



समाज परिवर्तनाची सर्वात मोठी ताकद आहे. विद्यार्थ्यांना योग्य वेळी प्रोत्साहन आणि आवश्यक साहित्य उपलब्ध झाले, तर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो आणि ते मोठी स्वप्ने पाहण्यास सक्षम होतात. समाजातील गरजू घटकांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या पद्मशाली सोशल फाउंडेशनचे कार्य निश्चितच प्रेरणादायी असून अशा विधायक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडण्यास मोठी मदत होत आहे.

प्रास्ताविकात बोलताना ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी म्हणाले, ''पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्ट गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने दप्तर वाटपाचा उपक्रम राबवत आहे. या दहा वर्षांत १,५०० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले असून यावर्षी शहरातील विविध शाळांमधील १५० गरजू विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ देण्यात आला आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. फाउंडेशनच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप, श्रावण महिन्यात महाप्रसाद भंडारा, गरजू रुग्णांना आर्थिक मदत, आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना सहकार्य तसेच विविध सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठीही फाउंडेशन सातत्याने प्रयत्नशील असते. भविष्यातही समाजातील गरजू घटकांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून मदतीचा हात देण्याचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहील.

यावेळी ट्रस्टचे सचिव अजयकुमार लयचेट्टी यांनी सांगितले की, पद्मशाली सोशल फाउंडेशन गेल्या दहा वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून यावर्षी शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. यामध्ये श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक विद्यालय, दादा चौधरी मराठी शाळा, महात्मा फुले विद्यामंदिर, दादा चौधरी विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (उक्कडगाव), प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कै. वि. ल. कुलकर्णी प्राथमिक शाळा, बालक मंदिर महिला मंडळ, सिताराम सारडा माध्यमिक विद्यालय, मनोहरलाल रामचंद्र सबलोक प्राथमिक विद्यालय, शारदा विद्यामंदिर, १०८ श्री महंत पंडित सुच्चासिंगजी महाराज माध्यमिक विद्यालय, श्रीमती पार्वतीबाई डहाणूरकर कन्या विद्यालय आणि महर्षी ग. ज. चितांबर विद्यामंदिर या शाळांमधील प्रत्येकी दहा विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले.

# आषाढीत संतपीठाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर!

### आता तरी संतपीठ पूर्ण क्षमतेने सुरू करा । चार दशकांच्या प्रतीक्षेनंतरही अपूर्ण सुविधा; सरकारकडे तातडीच्या निर्णयाची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** आषाढी एकादशीच्या भक्तिमय वातावरणात संतनगरी पैठणच्या बहुप्रतिक्षित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संतपीठाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. चार दशकांहून अधिक काळाच्या प्रतीक्षेनंतर २०२१ पासून संतपीठाचे प्राथमिक अभ्यासक्रम सुरू झाले असले, तरी अद्याप पूर्ण क्षमतेने संतपीठ कार्यान्वित झालेले नाही. त्यामुळे आवश्यक इमारती, शैक्षणिक सुविधा आणि मनुष्यबळ उपलब्ध करून संतपीठ तातडीने पूर्ण क्षमतेने सुरू करावे, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

संत एकनाथ महाराजांच्या कर्मभूमी असलेल्या पैठणमध्ये उभारण्यात येणारे संतपीठ हे वारकरी संप्रदाय, संत साहित्य आणि भारतीय अध्यात्माच्या अभ्यासाचे राष्ट्रीय केंद्र ठरण्याची क्षमता बाळगते. मात्र, वर्षानुवर्षे प्रकल्प रखडल्याने त्याची व्याप्ती मर्यादित राहिल्याची भावना वारकरी व संतप्रेमींमध्ये आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार विलास भुमरे, आमदार श्रीकांत भारतीय, आमदार अंबादास दानवे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रशासनाच्या पुढाकारामुळे अभ्यासक्रम सुरू झाले. मात्र, आता केवळ अभ्यासक्रम नव्हे, तर संतपीठाचा मूळ आराखडा प्रत्यक्षात उतरविण्याची वेळ आली असल्याचे कार्यकर्त्यांनी म्हटले आहे.

पैठण येथील उपलब्ध जागेवर संतपीठाच्या सर्व आवश्यक इमारती, संशोधन केंद्र, ग्रंथालय, विद्यार्थी वसतिगृह, आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि आवश्यक मनुष्यबळ तातडीने उपलब्ध करून संतपीठ पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विशेष निधीसह त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विष्णू ढवळे, दिनेश पारीख, रमेश लिंबोरे, अंबादास ढवळे, रमेश शेळके, महेश जोशी, दिलीप पोहेकर, राहुल पगारे, प्रसाद खिस्ती, रमेश पाठक, रमेश खांडेकर, कमलेश देशपांडे, शिवाजी तुपे, विलास मोरे, लक्ष्मण चौरे आदींनी केली आहे.

# कौडगाव ग्रामस्थांकडून बीएलओ रमेश कर्पे यांचा सन्मान

### दिव्यांगतेवर मात : मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेत उल्लेखनीय योगदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी तसेच शंभर टक्के काम पूर्ण केल्याबद्दल मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) तथा ग्रामपंचायत कर्मचारी रमेश दिगंबर कर्पे यांचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते गौरव करण्यात आला होता. या यशाबद्दल कौडगाव ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे, चुकीच्या नोंदी दुरुस्त करणे, मतदार यादी अद्ययावत ठेवणे तसेच शंभर टक्के अचूक आणि पारदर्शक मतदार यादी तयार करण्यासाठी



बीएलओंनी महत्त्वाची भूमिका बजावली. या मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बीएलओंचा जिल्हास्तरावर गौरव करण्यात आला असून त्यामध्ये रमेश दिगंबर कर्पे यांचा समावेश आहे.

रमेश कर्पे हे दिव्यांग असून एका पायाने पूर्णता: अपंग आहेत.मात्र त्यांनी येणाऱ्या अडचणींवर मात करत प्रत्येक मतदाराची माहिती अद्यावत केली. या पार्श्वभूमीवर कौडगाव ग्रामस्थांनी फेटा,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन रमेश कर्पे यांचा सत्कार केला.

# श्री रेणुका माता प्रतिष्ठान, नागापूर पायी दिंडी सोहळ्याचे उत्साहात प्रस्थान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी पायी दिंडी सोहळ्यांच्या माध्यमातून पंढरपूरकडे प्रस्थान करत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर श्री रेणुका माता प्रतिष्ठान, नागापूर यांच्या पायी दिंडी सोहळ्याचे उत्साहात प्रस्थान झाले. दिंडीचे बोल्हेगाव ग्रामस्थांच्या वतीने मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.

टाळ–मृदुंगाच्या गजरात, ''ज्ञानोबा–तुकाराम'', ''माऊली'' आणि ''विठ्ठल–विठ्ठल'' या नामघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. दिंडीतील वारकरी, भाविक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने बोल्हेगाव परिसरात धार्मिक व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले.



यावेळी स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे, ह.भ.प. तुकाराम महाराज कातोरे, ह.भ.प. बाबा महाराज कातोरे, तेजस डुरकुले, अविनाश वाटमोडे, शंकर वाटमोडे, नवनाथ कोलते, पंकज वाकळे, रावसाहेब वाटमोडे, नगरसेविका आशाबाई कातोरे, नाथाभाऊ वाटमोडे, राहुल कराळे, सुरेश वाकळे, श्याम वाकळे, भाऊसाहेब वाकळे, मारुती वाटमोडे, प्रल्हाद कातोरे, लोभाजी कातोरे यांच्यासह वारकरी, भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कुमारसिंह वाकळे म्हणाले की, आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या संतपरंपरेची ओळख असून विठुरायाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी पंढरपूरकडे निघाले आहेत. या सर्व वारकऱ्यांचा प्रवास सुखरूप, सुरक्षित आणि मंगलमय व्हावा, हीच पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना आहे.

ते पुढे म्हणाले की, वारकरी संप्रदायाला शेकडो वर्षांची उज्ज्वल परंपरा लाभली असून या परंपरेच्या माध्यमातून आपली संस्कृती, अध्यात्म आणि संतांचे विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य होत आहे. वारीमुळे समाजातील सर्व स्तरातील लोक एकत्र येतात, परस्पर विचारांची देवाणघेवाण होते आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ होते. धार्मिक परंपरा जपण्याबरोबरच समाजात बंधुभाव, समता आणि मानवतेचा संदेश देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वारकरी संप्रदाय करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# दलित महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** माळशिरस तालुक्यातील अकलूज जवळील चोंडेश्वरवाडी येथे उषा साठे या महिलेवर झालेल्या कथित गोळीबार प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी दलित महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, उषा साठे या त्यांच्या पतीसोबत अनेक वर्षांपासून जगन्नाथ देशमुख यांच्या शेतात सालगडी म्हणून काम करत होते, ६ जुलै रोजी शेतामध्ये काम करण्यासाठी गेले असता किंचाळण्याचा आवाज आला व तेथे जाऊन पाहिल्यावर उषा साठे यांच्या डोक्यात गोळी लागली होती, या घटनेत आरोपींनी उषा साठे यांच्याकडे शरीर सुखाची मागणी केली



होती ,त्यास नकार दिल्याने आरोपीने जीव घेण्याच्या उद्देशाने डोक्यात गोळी झाडून हत्या केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला असून, यापूर्वीही संबंधित आरोपींविरोधात महिलांवरील अत्याचारासह विविध तक्रारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच या प्रकरणाचा जलदगती न्यायालयात खटला चालवून आरोपींना कठोर शिक्षा देण्यात यावी, संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, तसेच आरोपींना मदत करणाऱ्या व्यक्तींचीही सखोल चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी,शासनाच्या वतीने पिडीत कुटुंबाला आर्थिक मदत करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

हे निवेदन दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. काशिनाथ सुलाखे पाटील, जिल्हाध्यक्ष संजय चांदणे, जिल्हा कार्याध्यक्ष कडुबाबा लोढे, ज्येष्ठ नेते नामदेवराव चांदणे, महिला जिल्हा अध्यक्ष अरुणाताई कांबळे, आशाताई सुलाखे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मंदाकिनी मेंगाळ, चंद्रकांत सकट, नानाभाऊ कांबळे, वरूण वाघमारे, आकाश लोखंडे, नानाभाऊ कांबळे, सुभाष सुलाखे, अशोक सुलाखे, सनी जगधने, लक्ष्मण साबळे याच्यासह संघटनेच्या इतर पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

## शब्दकोडे क्रमांक : ८

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | | ■ | ४ | ■ | ५ | | ६ |
| | ■ | ७ | ८ | | ■ | ९ | | १० | | ■ | |
| ११ | १२ | ■ | | ■ | १३ | | ■ | १४ | | १५ | ■ |
| ■ | १६ | १७ | | १८ | ■ | १९ | २० | | ■ | २१ | |
| २२ | | | ■ | २३ | २४ | | | ■ | २५ | | ■ |
| | ■ | २६ | २७ | ■ | | ■ | २८ | २९ | | ■ | ३० |
| ३१ | ३२ | ■ | ३३ | ३४ | ■ | ३५ | | | ■ | ३६ | |
| ■ | ३७ | ३८ | ■ | ३९ | ४० | ■ | ४१ | | | ■ | |
| ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | ४५ | ■ | | ■ | ४६ | ■ |
| ४७ | ४८ | | ■ | ४९ | ■ | ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ |
| ५४ | | ■ | ५५ | | ५६ | ■ | ५७ | ५८ | | ■ | |
| ■ | ५९ | | | ■ | ६० | | ■ | | ■ | ६१ | |

**आडवे शब्द:** १.नम्रता २.हिंदीत-पत्र ५.गोंधळ ७.राजवाडा ९.मृदंग ११.किल्ला १३.आकाशात चमकणारी चांदणी १४.कमकुवत मनाचा १६.विनाकारण केलेली बडबड १९.कपाळावर लावण्याचा टिळा २१.प्रत्येक २२.अंदाज २३.एक लोकप्रतिनिधी पद २५.हार २६.संघर्ष २८.नाश ३१.लक्ष्मी ३३.तलब ३५.फुलांची एक पंखुडी ३६.एक थोर कृष्ण भक्त ३७.हिंदीत-तीळ ३९.अस्वल ४१.बेडकांचे ओरडले डराव ... ४३.साद ४४.पातळ-विरुद्ध ४७.घर ५०.पंढरपूरची यात्रा५२. पोट ५३.लक्ष ५५.तूप ५७.कुटुंबशाही ५९.ढंग ६०.पावसाची झड ६१.किंमत **उभे शब्द :** १.पक्षी २.मरण देवता ३.विष ४.एक मंगल वाद्य ५ डोळ्यात लावतात ६ .ढोलकला लावता ती चामड्याची पट्टी ८.एक गोड पदार्थ ९ पळून गेलेला १०.वाहून नेणारा १२.पाण्याचे लहान तळे १५.तुफान १७.हिंदीत-खून १८ मित्र २० पोलिसांनी केलेली पकडा-पकडी २२.घरदार २५.सारखा २५.आब २६ तलवारीचा जोडीदार २९.दारू पिणाऱ्यांसाठी वापरतात ती एक उपाधी ३०.गराडा ३२ मृदा ३४.आमटीवर तरंगणारा तेलाचा तवंग ३८.साल ४०.शिक्षा ४२.हिंदीत विषय ४५.डाव्या हाताने खेळणारा ४६.आवड ४८.दाद ४९.नादमय ठेका ५१.रांग ५२.वजा ही संख्या ५३ रोकड ५५.बडा-उलट लिहा ५६.चिलट ५८संगीतात आवळतात तो सूर

### शब्दकोडे क्रमांक : ७ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पा | ल | क | ■ | दा | त | ■ | वि | रा | स | त | ■ |
| प | ■ | फ | ल | ब | ■ | मा | मा | ■ | सा | प | ळा |
| ड | बा | ■ | क | ■ | सा | व | धा | न | ■ | की | ■ |
| ■ | ब | ड | ब | ड | ■ | स | र | ■ | वा | र | स |
| ज | र | ब | ■ | ग | म | ■ | क | या | स | ■ | ह |
| मा | ■ | के | दा | र | ना | थ | ■ | द | ■ | ह | ल |
| व | न | ■ | ग | ■ | ई | ■ | द | गा | बा | ज | ■ |
| ■ | ज | ट | ■ | स | ■ | ब | ख | र | ■ | र | व |
| ब | र | ■ | ह | वा | ई | द | ल | ■ | गो | ■ | सा |
| ग | ■ | त | ■ | ल | ■ | क | ■ | ज | ■ | स | ह |
| दा | वा | न | ल | ■ | ख | ■ | पा | त | क | ■ | त |
| द | ■ | य | ■ | सं | ग | त | ■ | न | र | म | ■ |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### छावणी परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय घवघवीत यश; स्नेहबंधतर्फे गौरव



अहिल्यानगर - पी.एम.श्री. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा, छावणी परिषद, भिंगार येथील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत कु. आयेशा शेख हिने स्थान मिळविले, तर एनएमएमएस जिल्हा गुणवत्ता यादीत वेदांत साबळे व साई कोष्टी यांनी यश मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचा छावणी परिषद कार्यालयात छावणी परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी व स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते सन्मानपत्र व मेडल देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सीईओ पल्लवी विजयवंशी म्हणाल्या, ''विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम करून उच्च ध्येय गाठावे. शिक्षक व पालकांच्या मार्गदर्शनातून असेच गुणवंत विद्यार्थी घडत राहतील.'' डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, ''विद्यार्थ्यांचे यश हे त्यांच्या मेहनतीबरोबरच शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांच्या सहकार्याचे फलित आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे हा स्नेहबंध सोशल फौंडेशनचा उद्देश आहे.''या यशामागे सोन्याबापू लबडे, सुभाष भारूड, स्नेहल लवांडे व सीमा चोभे यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### निमगाव वाघा येथील श्री नवनाथ पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

अहिल्यानगर - निमगाव वाघा (ता. नगर) येथील श्री नवनाथ पायी दिंडीचे ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात व टाळ मृदंगाच्या गजरात श्री क्षेत्र पंढरपूरकडे नुकतेच प्रस्थान झाले. गावात भक्तीमय वातावरणात डोळे दिपवून टाकणारा रिंगण सोहळा पार पडला. या दिंडीत कल्याणच्या भाविकांसह गावाच्या पंचक्रोशीतील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. दिंडीतील भव्य रथाचे गावात जागोजागी स्वागत करुन भाविकांनी पादुकांच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. दिंडीचे हे २३ वे वर्ष आहे. गावात स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने वीणेकरी ह.भ.प. राम (प्रशांत) महाराज जाधव, ह.भ.प. विठ्ठल महाराज खळदकर, कल्याणचे ह.भ.प. धुंडा महाराज म्हसकर, पायी दिंडी सोहळा ट्रस्टचे अध्यक्ष एकनाथ डोंगरे व लक्ष्मण चौरे यांचा संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै.नाना डोंगरे यांनी सत्कार केला. प्रारंभी डोंगरे यांच्या हस्ते रथाचे पूजन करुन दिंडी सोहळ्याला प्रारंभ झाले. वारकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये श्री संत सावता महाराजांच्या मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी माजी सरपंच साहेबराव बोडखे, सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, दुध डेअरीचे चेअरमन गोकुळ जाधव, अनिल डोंगरे, गोरख फलके, भागचंद जाधव, सागर कापसे, मच्छिंद्र डोंगरे, डॉ. विजय जाधव, भाऊसाहेब कापसे, पिंटू जाधव, अरुण फलके, गुलाब जाधव, भरत बोडखे, संजय कापसे, जयराम जाधव, दत्तू फलके, कुमार फलके, संदिप डोंगरे, सुभाष कदम, बबन केदार, बाळू बोडखे आदींसह ग्रामस्थ, महिला वर्ग व भजनी मंडळातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पुणेअहिल्यानगरबीड मार्गावर 'पसायदान एक्सप्रेस' सुरु करण्याची मागणी

अहिल्यानगर - पुणेअहिल्यानगरबीड या मार्गावर दररोज नियमित प्रवासी रेल्वे सेवा सुरू करून तिला 'पसायदान एक्सप्रेस' असे नाव देण्यात यावे, अशी मागणी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने करण्यात आली आहे. रेल्वे ही केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचे साधन नसून शिक्षण, आरोग्य, रोजगार, उद्योग, व्यापार आणि सामाजिक न्यायाची जीवनवाहिनी आहे. या मागणीसाठी रविवार, १९ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता अहिल्यानगर येथील ऐतिहासिक दिल्ली गेट येथे आयोजित 'पसायदान राष्ट्रीय धारणा सत्याग्रहा'तून केंद्र सरकार आणि रेल्वे मंत्रालयाकडे साकडे घालण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.

# देवेंद्र फडणवीस हे शेतकऱ्यांच्या सुखदुःखात पाठीशी उभे असणारे एकमेव नेतृत्व

**भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे प्रतिपादन । शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व शेतकऱ्यांसह प्रत्येक नागरिकाच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा यासाठी गावागावातील शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांचे स्वप्न पूर्ण करणारे एकमेव नेतृत्व आहे. त्यामुळे राज्यातील तमाम शेतकरीवर्ग पूर्ण ताकदीनिशी देवाभाऊ सरकारच्या पाठीशी उभे आहे'' असे प्रतिपादन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी बुधवारी केले.

पीक कर्जमुक्तीचा निर्णय घेतल्याबद्दल राज्यातील शेतकऱ्यांच्या वतीने भाजप किसान मोर्चाने मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार सोहळा पार पडला. याप्रसंगी श्री. रविंद्र चव्हाण यांनी सभागृहाला संबोधित केले.

शेतरस्ते आणि पाणंद रस्ते, जलयुक्त शिवार अभियान, शेतीला मिळालेली आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड, कृषी पंपांना भर दिवसा मोफत वीज अशा फडणवीस यांच्या नेतृत्वात घेण्यात आलेल्या विविध निर्णय आणि योजनांचा यावेळी श्री. रविंद्र चव्हाण यांनी मागोवा घेतला. सरकारच्या कामगिरीतून शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या सोहळ्यादरम्यान भाजप प्रदेश सरचिटणीस आ. संजय कुटे यांनी राज्यातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी हात उंचावून आणि देवाभाऊ यांच्या नावाने जयघोष केला.

या सत्काराला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सोहळ्याकडे केवळ एक सत्कार सोहळा म्हणून न पाहता शेतकऱ्यांशी संवाद साधण्याची सुवर्णसंधी म्हणून पाहत असल्याचे नमूद केले. तसेच ''कोणतीही राजकीय निवडणूक डोळ्यांसमोर नसताना आम्ही कर्जमुक्तीचा निर्णय घेतला, कारण शेतकऱ्यांचे हित हा आमच्यासाठी राजकारणाचा विषय नाही. अनेकांना वाटत होतं सरकार कर्जमाफी करणार नाही. आपण आंदोलने करू... पण हे महायुतीचे सरकार आहे, शेतकऱ्यांच्या देवाभाऊचे सरकार आहे'' असंही ते म्हणाले.

७.५ अश्वशक्ती क्षमतेच्या कृषी पंपांना भर दिवसा आणि मोफत वीज देण्यात येत आहे. या पंपांसाठी असणारे ४८ हजार कोटींचे जुने वीज बिल माफ करत असल्याची घोषणाही फडणवीस यांनी यावेळी केली. ''शेतकऱ्यांची पाटी कोरी झाली पाहिजे आणि त्याला त्या पाटीवर नव्याने इतिहास लिहिता आला पाहिजे, या दृष्टीने घेतलेला हा निर्णय आहे'' असे फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी करण्यात येत असलेल्या कामगिरीविषयी शेतकरी वर्गात समाधान असल्याचे या सोहळ्यात दिसून आले. या सोहळ्याला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, भाजपा किसान मोर्चाचे राष्ट्रीय सरचिटणीस खा. अनिल बोंडे, आ. रणधीर सावरकर, आ. प्रवीण दरेकर, भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. संजय कुटे, भाजपा महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा अध्यक्षा आ. चित्रा वाघ, भाजपा महाराष्ट्र प्रदेश किसान मोर्चा अध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांच्यासह अनेक आमदार, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.

# मुख्य रस्त्याचे काम मंजूर आराखड्यानुसारच करा

**खासदार नीलेश लंके यांची सूचना । पारनेरच्या विकासाचा पाया भक्कम करण्यासाठी दूरदृष्टीचे नियोजन**
**चौकांचे सुशोभीकरण, दुभाजक, पथदिवे आणि भविष्यातील जलवाहिन्यांसाठी आताच तरतूद करण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर शहरातील विघ्नहर्ता रुग्णालय ते हिंद चौक दरम्यानच्या मुख्य रस्त्याचे काम मंजूर आराखड्यानुसारच पूर्ण करण्यात यावे आणि शहराच्या पुढील पन्नास वर्षांच्या विकासाचा विचार करून सर्व आवश्यक नागरी सुविधांची तरतूद करण्यात यावी, अशा स्पष्ट सूचना खासदार नीलेश लंके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना व संबंधित ठेकेदार कंपनीच्या प्रतिनिधींना दिल्या.

देवीभोयरे फाटा (पारनेर) ते खडकी (अहिल्यानगर) या ४८ किलोमीटर लांबीच्या राज्य मार्गाचे काम महाराष्ट्र रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत सुरू असून, या सिमेंट काँक्रीट रस्त्यासाठी खा. लंके यांच्या माध्यमातून ३६२ कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पारनेर शहरातून जाणाऱ्या या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी पारनेर नगरपंचायत कार्यालयात खासदार लंके यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले.

बैठकीत खासदार लंके यांनी सांगितले की, संपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन मंजूर आराखड्यानुसारच काम पूर्ण करणे आवश्यक आहे. शहरातून जाणाऱ्या रस्त्यावर दुभाजक, आधुनिक पथदिवे, सुरक्षित वाहतूक व्यवस्था आणि नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसेच पारनेर शहरासाठी मुळा धरणातून प्रस्तावित असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिन्या टाकण्यासाठी आवश्यक तरतूद आताच करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात रस्ता पुन्हा खोदण्याची वेळ येणार नाही.

याशिवाय शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण, अपघातप्रवण धोकादायक वळणांचे निर्मूलन आणि वाहतुकीच्या दृष्टीने सुरक्षित नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. या कामांसाठी आवश्यक असल्यास निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

बैठकीत बाजार समितीचे संचालक रा. या. औटी यांनी राज्य मार्गामुळे नगर-कल्याण, पुणे-नाशिक आणि नगर-पुणे या प्रमुख मार्गांवरील वाहतूक वाढणार असल्याने शहरातील रस्त्याचे नियोजित रुंदीकरण अपरिहार्य असल्याचे मत व्यक्त केले.

या बैठकीस तहसीलदार गायत्री सौंदाणे, बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर, संचालक रा. या. औटी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर, डॉ. बाळासाहेब कावरे, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, उपनगराध्यक्षा सुप्रिया शिंदे, माजी नगराध्यक्ष नितीन अडसूळ, माजी उपनगराध्यक्षा सुरेखा भालेकर, मुख्याधिकारी प्रियंका शिंदे, पाणीपुरवठा समितीचे सभापती योगेश मते तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, संबंधित ठेकेदार कंपनीचे प्रतिनिधी आणि विविध मान्यवर उपस्थित होते.

**ग्रीन सिटी प्रोजेक्ट अंतर्गत अकराशे विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप**

# 'झाडे लावा झाडे जगवा' ही संस्कृती रुजवण्याची गरज– उपमहापौर धनंजय जाधव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिवसेंदिवस वातावरणातील तापमानाचे प्रमाण वाढत चालले आहे.आमच्या काळात ३६ डिग्री तापमान होते.आज ४२ डिग्री तापमान होते. पुढील दहा वर्षांनी ५० डिग्री तापमान होऊ शकते. त्यावेळेस बाहेर फिरणे देखील अशक्य होईल.पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडे लावून ती संवर्धन करण्याची आवश्यकता आहे.शाळेतील मुलांनी दिलेली झाडे त्यांच्या माता-पित्यांच्या नावाने त्यांच्या घराजवळील परिसरामध्ये अंगणात लावून वर्षभर ती झाडे संवर्धन व संगोपन करावे.पुढील वर्षी पुन्हा एकदा कार्यक्रम घेऊन ज्या दहा विद्यार्थ्यांनी झाडांची निगा राखून चांगल्या पद्धतीने संगोपन केले आहे.त्यांना ग्रीन सिटी प्रोजेक्ट तर्फे पुरस्कार देऊन गौरवण्यात येईल. शहरातील वाढते तापमान कमी करण्यासाठी ''झाडे लावा झाडे जगवा'' ही संस्कृती रुजविण्याची गरज आहे.असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालय,दादा चौधरी मराठी शाळा,मेहेर इंग्लिश स्कूल,भाईसथ्था नाईट हायस्कूल या शाळेतील विद्यार्थ्यांना पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ग्रीन सिटी प्रकल्प अंतर्गत ११०० विद्यार्थ्यांना उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक दत्ता गाडळकर,भाजपा ओबीसी चे गणेश विद्दे,हिंद सेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,भाईसथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी,कार्यकारणी सदस्या प्रा.ज्योतीताई कुलकर्णी,मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी,दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई,दादा चौधरी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री ठोकळ,मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले, मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य प्राध्यापिका अनुरीता झगडे, अजय महाजन,प्रसाद सामलेटी,मनोज हिरणवाळे, औटी सर आदी उपस्थित होते.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, ग्रीनसिटी प्रोजेक्ट मूळे शहरात पर्यावरणाची मोठी चळवळ उभी राहिली आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात झाडे लावल्याने पर्यावरणाचे रक्षण होऊन मोठ्या प्रमाणात पाऊस पडेल.यासाठी शाळा, महाविद्यालयातून प्रबोधन होणे गरजेचे आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी दिलेले रोपांचे वृक्षारोपण करून संवर्धन करावे.

# हस्तीमलजी मुनोत ९२ वर्षांच्या जीवनप्रवासातील ६० वर्षांचे सहकार नेतृत्व

१८ जुलै हा दिवस अहमदनगरच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रासाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक, दूरदर्शी उद्योजक, समाजसेवक आणि मूल्याधिष्ठित नेतृत्वाचे प्रतीक असलेले श्री हस्तीमलजी मुनोत आपल्या जीवनाची ९२ वर्षे पूर्ण करून ९३ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यांच्या या प्रदीर्घ जीवनप्रवासात जवळपास सहा दशकांचा सहकार आणि बँकिंग क्षेत्रातील अविरत प्रवास सामावलेला आहे. हा प्रवास केवळ एका यशस्वी उद्योजकाचा इतिहास नाही, तर अहमदनगरच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक परिवर्तनाचा साक्षीदार असलेला प्रेरणादायी प्रवास आहे.



प्रा. डॉ. स्वाती मुनोत

काही व्यक्ती संस्था उभ्या करतात, काही उद्योग उभे करतात; परंतु काही दुर्मीळ व्यक्तिमत्त्वे अशी असतात जी माणसे घडवतात, विश्वास निर्माण करतात आणि मूल्यांची परंपरा रुजवतात. हस्तीमलजी मुनोत हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. त्यांनी आपल्या आयुष्यात प्रत्येक क्षेत्रात कार्य करताना केवळ यश मिळविण्याचा प्रयत्न केला नाही, तर समाजाला काहीतरी परत देण्याचा ध्यास घेतला. त्यांच्यासाठी नेतृत्व म्हणजे अधिकार नव्हे, तर जबाबदारी; संपत्ती म्हणजे वैयक्तिक समृद्धी नव्हे, तर समाजाच्या विकासाचे साधन; आणि यश म्हणजे स्वतः उंच जाणे नव्हे, तर इतरांनाही सोबत घेऊन पुढे जाणे.

१९६० च्या दशकातच हस्तीमलजींना बँकिंग आणि सहकार क्षेत्राची विशेष आवड निर्माण झाली. आर्थिक व्यवहारातील शिस्त, नियोजन आणि व्यापारी समाजाच्या गरजांचे त्यांना असलेले सूक्ष्म ज्ञान पुढे त्यांच्या कार्याचे बलस्थान ठरले. अर्बन बँकेचे संचालक म्हणून कार्य करताना त्यांनी सहकार चळवळीचे तत्त्वज्ञान जवळून अनुभवले. १९६९ मध्ये बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर नगरमधील व्यापारी वर्ग अनेक अडचणींना सामोरा जात होता. लहान व मध्यम व्यापाऱ्यांना सहज कर्जपुरवठा होत नव्हता. ही गरज ओळखून त्यांनी कै. हेमराज जी आणि कोण म्हटले तुम्ही,बोरा, सुरजमलजी भंडारी , कैलासवासी शांतीलालजी बोरा आणि इतर सहकाऱ्यांसह अहमदनगर मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

सुरुवातीचा प्रवास अत्यंत संघर्षमय होता. भागभांडवल उभारणे, सभासद नोंदणी करणे, लोकांचा विश्वास संपादन करणे आणि नव्या संस्थेला स्थैर्य प्राप्त करून देणे ही मोठी आव्हाने होती. अशा वेळी त्यांच्या पत्नी सौ. इचरजबाई (जीजी) यांनी घेतलेले पहिले सभासदत्व हे केवळ आर्थिक योगदान नव्हते तरच चांगल्या कामाची सुरुवात होती ते त्यांच्या स्वप्नावर ठेवलेल्या विश्वासाचे आणि कुटुंबाच्या निःस्वार्थ पाठिंब्याचे प्रतीक होते.

आज त्या छोट्याशा रोपट्याचे रूपांतर एका भक्कम वटवृक्षात झाले आहे. अहमदनगर मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक आज महाराष्ट्रातील आदर्श सहकारी बँक म्हणून ओळखली जाते. आधुनिक तंत्रज्ञान, कोअर बँकिंग, डिजिटल बँकिंग सेवा, विस्तृत शाखा जाळे, ग्राहकाभिमुख कार्यपद्धती आणि पारदर्शक प्रशासन यांच्या बळावर बँकेने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या यशामागे हस्तीमलजींची दूरदृष्टी, प्रामाणिकपणा, संयम आणि माणसांवर ठेवलेला विश्वास आहे.

ते नेहमी प्रेमाने म्हणतात, ''अहमदनगर मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक म्हणजे माझे दुसरे कुटुंब.'' या एका वाक्यात त्यांच्या नेतृत्वाचे संपूर्ण तत्त्वज्ञान सामावलेले आहे. प्रत्येक कर्मचारी, सभासद, ठेवीदार आणि ग्राहक यांच्याशी त्यांनी आत्मीयतेचे नाते निर्माण केले. कर्मचारी समाधानी असेल तरच संस्था प्रगती करू शकते, हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे कर्मचारी कल्याणाच्या अनेक योजना, आरोग्यविमा, प्रोत्साहनपर सुविधा आणि सन्मानाची संस्कृती त्यांनी जोपासली. सहकार क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाची दखल घेत केंद्रीय मंत्री मा. श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते त्यांना ''सहकारयात्री'' या प्रतिष्ठेच्या सन्मानाने गौरविण्यात आले. हा सन्मान त्यांच्या सहा दशकांच्या समर्पित सेवेला मिळालेली राष्ट्रीय पातळीवरील गौरवमुद्रा आहे.

हस्तीमलजींच्या दृष्टीने आर्थिक प्रगती आणि सामाजिक जबाबदारी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. १९६३ मध्ये स्थापन झालेल्या श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या माध्यमातून त्यांनी समाजोपयोगी कार्याचा भक्कम पाया रचला. हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, गरजू रुग्णांना वैद्यकीय सहाय्य, जयपूर फूट शिबिरे, नेत्रतपासणी, प्लास्टिक सर्जरी शिबिरे, डायलिसिस केंद्र, पॅथॉलॉजी सुविधा आणि विविध समाजोपयोगी प्रकल्प त्यांच्या प्रेरणेतून साकार झाले. या सर्व कार्यात संस्थेच्या विश्वस्तांनीही मोलाची साथ दिली आणि सामाजिक बांधिलकीची ही परंपरा अधिक बळकट केली.

देशावर संकट आले तेव्हा मदतीसाठी ते सदैव पुढे राहिले. किल्लारी भूकंप, गुजरात भूकंप, त्सुनामी, मुंबई पूर, आंध्र प्रदेशातील चक्रीवादळ, कारगिल युद्ध तसेच पंतप्रधान आणि मुख्यमंत्री सहायता निधीसाठी त्यांनी उदार आर्थिक मदत केली. त्यांच्यासाठी समाजसेवा ही दानधर्माची बाब नव्हती; ती समाजाचे ऋण फेडण्याची नैतिक जबाबदारी होती.

शिक्षण क्षेत्राबद्दल त्यांना असलेली आस्था विशेष उल्लेखनीय आहे. व्यवसायातील जबाबदाऱ्यांमुळे त्यांना स्वतःचे शिक्षण पूर्ण करता आले नाही; मात्र त्या अपूर्णतेचे दुःख त्यांनी समाजासाठी संधीमध्ये रूपांतरित केले. राष्ट्रभाषा शिक्षण मंडळाच्या माध्यमातून पंडित नेहरू हिंदी विद्यालयासाठी भव्य इमारत उभारण्यात त्यांचे मोलाचे योगदान राहिले. पुढे २००७ मध्ये पुणे विद्यापीठाची मान्यता प्राप्त असे अहमदनगर जिल्ह्यातील पहिले सायंकालीन महाविद्यालय म्हणून के. जी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सची स्थापना करून त्यांनी दिवसभर काम करणाऱ्या, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या आणि उच्च शिक्षणाची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी नवे दालन खुले केले.

आज हे महाविद्यालय गुणवत्ता, कौशल्याधारित शिक्षण, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि विद्यार्थीकेंद्री दृष्टिकोन यांमुळे स्वतंत्र ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाले आहे. हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणाऱ्या या संस्थेमागे हस्तीमलजींची दूरदृष्टी आणि शिक्षणावरील निष्ठा स्पष्टपणे दिसून येते.

धार्मिक क्षेत्रातही हस्तीमलजींचे योगदान तितकेच मोलाचे आहे. जैन धर्मातील श्रावकाचाराच्या मूल्यांवर त्यांची नितांत श्रद्धा आहे. पूज्य आनंदऋषिजी महाराजांच्या विचारांचा आणि संस्कारांचा त्यांच्या जीवनावर अत्यंत गाढ प्रभाव आहे. वर्तमान आचार्य पूज्य शिवमुनिमहाराज यांच्यावरील त्यांची अपार श्रद्धा, निष्ठा आणि आदर हा त्यांच्या धार्मिक जीवनाचा आधार आहे. धर्म म्हणजे केवळ पूजा-अर्चा नव्हे, तर संयम, सेवा, सदाचार आणि समाजहिताचे आचरण, हा संदेश त्यांनी आपल्या जीवनातून दिला.

१९९२ पासून श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांनी समर्थपणे सांभाळली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आनंद स्मृती कक्ष, आनंद समवशरणाचा विस्तार, भक्तनिवास, साध्वी भवन आणि मानव सेवा केंद्र यांसारखे अनेक भव्य प्रकल्प साकार झाले. धार्मिक परीक्षा मंडळ, स्वाध्याय संघ, साधू-साध्वींची सेवा, चातुर्मासाचे नियोजन आणि धार्मिक शिक्षणाच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. २०१५ मधील संघातील आव्हानात्मक परिस्थितीत त्यांनी संयम, संवाद आणि विश्वास यांच्या बळावर ऐक्य निर्माण केले. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना ''जैन समाजरत्न'' या प्रतिष्ठेच्या सन्मानाने गौरविण्यात आले.

हस्तीमलजींच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात प्रभावी गुण म्हणजे त्यांची नम्रता. ते नेहमी म्हणतात, ''माझ्याकडून काही नवीन निर्माण झाले याचा अर्थ मी इतरांपेक्षा जास्त हुशार आहे असे नाही. फक्त वाट पाहण्याची आणि सातत्याने प्रयत्न करण्याची तयारी माझ्यात थोडी अधिक होती.'' या एका विचारातून त्यांच्या जीवनतत्त्वज्ञानाचे सार स्पष्ट होते. बुद्धिमत्तेपेक्षा संयम, पदापेक्षा सेवा, यशापेक्षा कर्तव्य आणि प्रसिद्धीपेक्षा मूल्यांना त्यांनी अधिक महत्त्व दिले.

व्यवसाय, समाजकार्य आणि विविध संस्थांचे नेतृत्व सांभाळताना त्यांनी कुटुंबालाही तितकेच महत्त्व दिले. एकत्र कुटुंब व्यवस्थेवर त्यांचा दृढ विश्वास आहे. व्यवसायामुळे कुटुंबाची रचना बदलली असली, तरी दरवर्षी दिवाळीला संपूर्ण नेवासकर-मुनोत परिवार एकत्र यावा ही परंपरा त्यांनी आजही जपली आहे. प्रत्येक सदस्याने स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करावी, आपल्या आवडी-निवडी जोपासाव्यात आणि संस्कार कधीही विसरू नयेत, हा त्यांचा कायमचा आग्रह राहिला आहे.

वयाच्या ९२ व्या वर्षातही त्यांची जिज्ञासा, शिकण्याची वृत्ती आणि कार्यतत्परता तरुणांना प्रेरणा देणारी आहे. नवीन तंत्रज्ञान, आधुनिक व्यवस्थापन आणि बदलत्या काळाशी जुळवून घेण्याची त्यांची तयारी आजही कायम आहे. जबाबदाऱ्या योग्य व्यक्तींवर विश्वासाने सोपवून त्यांच्यात नेतृत्व विकसित करणे ही त्यांची कार्यशैली अनेक संस्थांसाठी आदर्श ठरली आहे.

आज हस्तीमलजी मुनोत यांच्या ९२ वर्षांच्या जीवनप्रवासाकडे मागे वळून पाहताना जाणवते की त्यांनी केवळ संस्था उभारल्या नाहीत, तर विश्वास उभारला; केवळ उद्योग उभारले नाहीत, तर मूल्ये रुजवली; केवळ संपत्ती निर्माण केली नाही, तर समाज समृद्ध केला. सहकार क्षेत्रातील सहा दशकांचा त्यांचा प्रवास म्हणजे प्रामाणिकपणा, दूरदृष्टी, सातत्य, सेवा आणि नेतृत्व यांचा आदर्श संगम आहे.

आजच्या पिढीसाठी त्यांचे संपूर्ण आयुष्य एक प्रेरणादायी संदेश देऊन जातेयश हे पद, पैसा किंवा प्रतिष्ठेत नसते; ते माणसे जोडण्यात, समाजासाठी काहीतरी निर्माण करण्यात आणि मूल्यांशी तडजोड न करता आयुष्य जगण्यात असते. म्हणूनच हस्तीमलजी मुनोत हे केवळ यशस्वी उद्योजक किंवा सहकार क्षेत्रातील नेते नाहीत, तर संस्कार, सहकार, समाजसेवा आणि अध्यात्म यांचा सुंदर मिलाफ असलेले प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त आणि सहकार क्षेत्रातील सहा दशकांच्या अद्वितीय योगदानाबद्दल त्यांना मनःपूर्वक अभिवादन. त्यांना उत्तम आरोग्य, प्रदीर्घ आयुष्य आणि समाजसेवेचा अखंड उत्साह लाभत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# आनंद चालिसा पाठ जीवनाचे सार्थक करणारा - पूज्य कुंदनऋषीजी महाराज

## नवीपेठ जैन स्थानकात आनंद चालिसा पाठची वर्षपूर्ती




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आताच्या काळात प्रचंड धावपळ आणि सतत जिंकण्याच्या स्पर्धेमुळे मानसिक शांतता कमी होत आहे. यासाठी जप तप आराधना आणि धर्मांतरण महत्वाचे आहे. आचार्यश्रींचे कृपाशीर्वाद असलेल्या अहिल्या नगरमध्ये भाविक श्रद्धेने धर्माचरण करतात. नवीपेठ येथील जैन स्थानकाला अनेक तपस्वींचे सान्निध्य लाभले आहे. याठिकाणी एक प्रकारची सकारात्मक ऊर्जा आहे. येथे वर्षभरापासून दर शुक्रवारी रात्री आनंद चालिसा पाठ अखंडपणे चालू आहे. आबालवृद्ध भाविक यात सहभागी होतात. अशा धार्मिक कार्यांमुळे समाजात आनंद वाढतो, आत्मिक समाधान मिळून नवचैतन्य येते. आनंद चालिसा पाठ जीवनाचे सार्थक करणारा आहे, अशा भावना महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी महाराज यांनी व्यक्त केल्या.

नवी पेठ येथील जैन स्थानकात आनंद चालिसा पाठ वर्षपूर्ती साजरी करण्यात आली. यावेळी पूज्य आलोकऋषीजी म.सा., जैन श्रावक संघाचे सेक्रेटरी संतोष गांधी, जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत, सुभाष भंडारी, पारस लोढा, भरत बागरेचा, सचिन डागा, आनंद मुथा, बाबालाल गांधी, हेमंत मुथा, अमोल कटारिया, मनिषा मुनोत, मिनाताई मुनोत, ममता कटारिया आदी उपस्थित होते.

प्रारंभी वंदना काठेड यांनी स्वागत गीत गायले. जय आनंद महावीर युवक मंडळाने प्रभावना दिली. स्वागत शैलेश मुनोत यांनी केले तर सचिन डागा यांनी आभार मानले. सकारात्मक विचार आणि ऊर्जा देणारा आनंद चालिसा पाठ उपक्रम भविष्यातही कायम राखण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. दर शुक्रवारी रात्री ९ वाजता होणाऱ्या आनंद चालिसा पाठ कार्यक्रमात जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आनंद चालिसा पाठ मंडळातर्फे करण्यात आले आहे.

# सावेडीगावातून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या दिंडीचे ‘रोज एक गाव, एक झाड’चा पर्यावरणपूरक उपक्रम

## वारीसोबत हरित वारीचा संदेश; प्रत्येक मुक्कामावर होणार वृक्षारोपण; चंद्रभागेच्या तीरावर होणार अभियानाची सांगता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आषाढी वारीच्या पवित्र पर्वानिमित्त शहरातील सावेडीगाव येथून श्री क्षेत्र पंढरपूरकडे निघालेल्या पायी दिंडीचे नुकतेच अत्यंत भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. ह.भ.प. चंद्रकांत महाराज बारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांनी ‘‘ज्ञानोबा–तुकोबा’’, ‘‘माऊली... माऊली...’’ अशा जयघोषात टाळ–मृदंगाच्या निनादात आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजरात दिंडीला सुरुवात केली. पारंपरिक भक्ती, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी ही दिंडी यंदा विशेष ठरत आहे.

यंदाच्या वारीत ‘‘रोज एक गाव एक झाड’’ हा संकल्प राबविण्यात येत असून, दिंडी ज्या–ज्या गावांमध्ये मुक्काम करेल त्या प्रत्येक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे. लिनेस क्लब व निसर्ग व सामाजिक प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हाध्यक्षा लतिकाताई पवार यांच्या पुढाकारातून हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पर्यावरण संवर्धनाची जनजागृती करत भाविकांच्या मनात वृक्षसंवर्धनाची भावना रुजविण्याचा या अभियानामागील प्रमुख उद्देश आहे.

या अभियानाची सुरुवात नगर तालुक्यातील साकत येथे बाजीराव गायकवाड यांच्या निवासस्थानी चिकूच्या रोपाची लागवड करून करण्यात आली. दिंडीच्या मुक्कामस्थळी भाविकांना प्रसादस्वरूप रोपे देण्यात येत असून, त्या रोपांचे संगोपन करण्याचा निर्धारही ग्रामस्थांनी व्यक्त केला. दिंडीची आठवण म्हणून ही झाडे भविष्यात पर्यावरणाचे रक्षण करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

दिंडीचा प्रवास जसा भक्तीचा आहे, तसाच तो पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा ठरणार आहे. या उपक्रमाचा समारोप श्री क्षेत्र पंढरपूर येथे चंद्रभागा नदीच्या तीरावर वृक्षारोपण करून करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी नगरसेवक तथा राष्ट्रवादी शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर आणि उपमहापौर धनंजय जाधव यांनी विविध देशी प्रजातींची तसेच फळझाडांची रोपे उपलब्ध करून दिली. त्यामुळे संपूर्ण वारी मार्गावर स्थानिक हवामानाला पूरक वृक्षांची लागवड होणार असून पर्यावरण संवर्धनाला हातभार लागणार आहे.

ह.भ.प. चंद्रकांत महाराज बारस्कर व ह.भ.प. लताताई महाराज बारस्कर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी निसर्ग व सामाजिक पर्यावरण मंडळाच्या जिल्हाध्यक्षा लतिकाताई पवार, कार्याध्यक्षा छायाताई राजपूत, अशोक वाकळे, बाळासाहेब वाकळे, देवीदास बारस्कर, तुकाराम बारस्कर, राजेंद्र बारस्कर, सुषमा दंडवते, पुष्पा वाकळे, मंदा वाकळे, शांता गाडे, गंगू वाघ, अलका गाडे, शरद देशपांडे, संपत बारस्कर, संगीता देव्हारे यांच्यासह वारकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ह.भ.प. चंद्रकांत महाराज बारस्कर म्हणाले की, वारी ही केवळ पंढरपूरकडे चालण्याची परंपरा नसून ती आत्मशुद्धी, समाजप्रबोधन आणि सेवाभावाची जीवनशाळा आहे. संतांनी दिलेला निसर्गप्रेमाचा आणि सर्व जीवमात्रांविषयी करुणेचा संदेश आपण कृतीत उतरविणे ही काळाची गरज आहे. विठ्ठलभक्ती करताना पर्यावरणाचे रक्षण करणे हेही आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

लतिकाताई पवार म्हणाल्या की, आज हवामान बदल, वाढते प्रदूषण आणि कमी होत चाललेले वृक्ष हे संपूर्ण मानवजातीसमोरील गंभीर प्रश्न आहेत. या पार्श्वभूमीवर वारीसारख्या लोकचळवळीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा आमचा प्रयत्न आहे. ‘रोज एक गाव, एक झाड’ हा उपक्रम केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित नसून प्रत्येक लावलेल्या रोपाचे संगोपन व्हावे, ही त्यामागील भावना आहे. प्रसाद म्हणून दिलेले रोप जपले गेले, तर ते भविष्यात हजारो लोकांना सावली, फळे आणि शुद्ध प्राणवायू देईल. संतांच्या विचारातून प्रेरणा घेत प्रत्येकाने निसर्गरक्षणाचा संकल्प करावा, हाच या अभियानाचा मुख्य उद्देश त्यांनी स्पष्ट केला.

# थकीत ऊस बिलासाठी शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा

## पैठण तहसील कार्यालयातील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन; घोषणाबाजीने परिसर दणाणला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–**संत एकनाथ सचिन घायाळ शुगर कारखान्याकडील थकीत ऊस बिलाच्या प्रश्नावर शेतकऱ्यांनी शुक्रवारी आक्रमक भूमिका घेतली. पैठण तहसील कार्यालयाच्या आवारातील पाण्याच्या टाकीवर चढून शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलन सुरू केल्याने प्रशासनाची धावपळ उडाली.

शेतकरी संघटनेचे पवनराजे शिसोदे, सुभाष नवथर आणि संतोष खराद (सोलनापूर) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. थकीत ऊस बिले तातडीने अदा करावीत, या मागणीसाठी आंदोलकांनी पाण्याच्या टाकीवर चढून जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे तहसील कार्यालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत रक्कम तातडीने अदा करण्यात यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला. घटनेची माहिती मिळताच महसूल व पोलीस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत आंदोलकांशी चर्चा सुरू केली. आंदोलनामुळे तहसील कार्यालय परिसरात मोठी गर्दी झाली असून प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

# शिंगवे नाईक-नांदगाव वैकुंठ महंत लक्ष्मणदास महाराज पायी दिंडी पालखी सोहळ्याचे नालेगावात भक्तिमय स्वागत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या नगर तालुक्यातील शिंगवे नाईकनांदगाव वैकुंठ महंत लक्ष्मणदास महाराज पायी दिंडी पालखी सोहळ्याचे नालेगाव येथील गाडगीळ पटांगणात मोठ्या भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. श्री पावन हानुमान व्यायामशाळा मित्र मंडळाच्या वतीने पारंपरिक पद्धतीने वारकऱ्यांचे स्वागत करून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. टाळ–मृदुंगाच्या गजरात, संत माऊली, तुकाराम आणि विठुरायाच्या अखंड नामघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

कार्यक्रमास माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल, सुनिता मुदगल यांच्यासह नालेगाव परिसरातील ग्रामस्थ, वारकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल म्हणाले की, महाराष्ट्राची वारकरी परंपरा ही केवळ धार्मिक चळवळ नसून समाजात एकात्मता, बंधुभाव, समता आणि अध्यात्मिक विचारांची देवाणघेवाण घडवून आणणारी महान परंपरा आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने लाखो वारकरी श्री पांडुरंगाच्या दर्शनासाठी पायी प्रवास करतात आणि ठिकठिकाणी समाजातील विविध घटक त्यांच्या सेवेसाठी पुढाकार घेतात.

ते पुढे म्हणाले की, नालेगाव गाडगीळ पटांगण येथे दरवर्षी सालाबादप्रमाणे टाळ–मृदुंगाच्या गजरात आणि संत माऊली, तुकाराम, विठुरायाच्या जयघोषात दिंडीचे स्वागत केले जाते. श्री पावन हानुमान व्यायामशाळा मित्र मंडळ वर्षभर विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून नागरिकांना एकत्र आणण्याचे कार्य करत आहे. अशा कार्यक्रमांतून अध्यात्मिक विचारांची देवाणघेवाण होत असून आपला सांस्कृतिक वारसा अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी ह.भ.प. शंकर महाराज पुंड म्हणाले की, नालेगाव गाडगीळ पटांगण येथे मुदगल परिवाराच्या वतीने दरवर्षी वारकरी पायी दिंडी पालखी सोहळ्याचे स्वागत करून महाप्रसादाचे वाटप केले जाते. वारकऱ्यांच्या सेवेसाठी अत्यंत श्रद्धेने आणि सातत्याने हे कार्य केले जात असून, ही सेवा म्हणजेच विठ्ठलभक्तीचे जिवंत उदाहरण आहे.

माजी नगरसेवक दत्तात्रय मुदगल धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा वारसा जपत वारकऱ्यांच्या सेवेत सातत्याने कार्यरत असून समाजात सेवाभाव आणि अध्यात्माची प्रेरणा देत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

# ५ ते ८३ वर्षांच्या खेळाडूंची बुद्धीची कसोटी

## तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ देशातून ३८० पेक्षा जास्त खेळाडूंचा सहभाग



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात झाला. लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे सुरू झालेल्या या तीन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य कृष्णा भंडलकर यांच्या हस्ते बुद्धिबळ पटावर प्रतीकात्मक चाल देऊन करण्यात आले.

यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी, सचिव यशवंत बापट, अमोल घोलप, डॉ. अमोल तांबे, सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे, शाम कांबळे, अनुराधा बापट, प्रकाश गुजराथी, रोहिणी आडकर, शुभदा ठोंबरे, संजय खडके, स्वप्निल भगूरकर, नवनीत कोठारी, मनीष जसवानी, सनी गुगळे, चेतन कड, अतुल कोठारी, पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, दीपक चव्हाण, विजय ढाले, डी. बी. चौरे, शार्दुल टापसे, देवेंद्र ढोकळे, शिरीष इंदलकर, प्रशांत धंगेकर यांच्यासह खेळाडू व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात सचिव यशवंत बापट यांनी संघटनेच्या कार्याची माहिती देताना सांगितले की, या स्पर्धेसाठी आंध्र प्रदेश, गोवा, गुजरात, हरियाणा, झारखंड, कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगणा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार, जम्मू-काश्मीर तसेच महाराष्ट्र राज्यातून ३८० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून बुद्धिबळ क्षेत्रातील नरेंद्र फिरोदिया यांच्या योगदानाला अभिवादन म्हणून त्यांच्या नावाने सलग तिसऱ्यांदा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, या स्पर्धेत अवघ्या पाच वर्षांच्या बालकांपासून ते ८३ वर्षांच्या ज्येष्ठ खेळाडूंपर्यंत विविध वयोगटातील बुद्धिबळपटू सहभागी झाले असून, आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर यशाची उत्तुंग भरारी घेण्यासाठी ते सज्ज झाले आहेत.

अध्यक्षीय भाषणात नरेंद्र फिरोदिया यांनी सांगितले की, अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या फिडे रेटेड क्लासिक स्पर्धेला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून विचारशक्ती, संयम आणि नियोजन यांची कसोटी आहे. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांना राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देण्यासाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.

(पान १ वरून)

## शहरात सक्षम विरोधी पक्ष असणे किती आवश्यक आहे हे मतदारांनी समजून घ्यावे - किरण काळे

उठले आहेत. आम्ही कालही या घटकांच्या साठी लढलो. उद्याही लढू. मात्र आपण चुकीच्या लोकांच्या हाती सत्तेच्या चाव्या दिल्या तर काय दुष्परिणाम होतात याचे आत्मपरीक्षण मतदारांनी देखील करण्याची गरज असल्याचे किरण काळे यांनी म्हटले आहे.

**ठराव मंजूर करणारे गद्दार सेनेत, गद्दार राष्ट्रवादीत :**

सन २०२३ च्या महासभेत जनविरोधी या ठरावाच्या बाजूने जे उभे राहिले, सूचक, अनुमोदक झाले, ते आज गद्दार सेनेत आणि गद्दार राष्ट्रवादीत आहेत. निवडणूक होईपर्यंत त्यांनी कळ काढली. पण आता आपल्या कार्यकर्ते ठेकेदारांना बिल देण्यासाठी आणि मनपा तिजोरीवर दरोडा घालण्यासाठी तिजोरीत दमडी शिल्लक नसल्यामुळे सत्तेच्या जोरावर पुन्हा हा घाट घातला आहे. येत्या महासभेत या निर्णयाला सत्ताधारी नगरसेवकांनी मंजुरी देऊ नये. अन्यथा ठाकरे शिवसेना आक्रमक पवित्रा घेईल, असा इशारा काळे यांनी दिला आहे.

## भगवानबाबा मल्टिस्टेट पतसंस्थेत अडीच कोटींची फसवणुक उघड

उडवा–उडवीची उत्तरे देऊन पैसे परत दिले गेले नाही. त्यामुळे सतिष रामचंद्र पठारे (रा. गुगळे कॉलनी, बुऱ्हाणनगर) यांनी त्याच्याकडे पैशाचा पाठपुरावा केल्यानंतरही त्यांना पैसे मिळाल्यो त्यांनी चेअरमनसह ७ जणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास उपनिरीक्षक दिपक मेढे हे करीत आहेत.

## चेअरमनपदी संतोष साबळे; व्हाईस चेअरमनपदी सुधीर उंडे

संतोष हरिभाऊ खंडागळे, संगीता किसनराव परोडकर, अर्चना प्रकाश गुंड आणि सुरेखा सदाशिव लांडगे यांचा समावेश आहे. सर्व संचालकांच्या उपस्थितीत निवड प्रक्रिया शांततापूर्ण वातावरणात पार पडली.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष तथा पतसंस्थेचे जेष्ठ संचालक किशोर जेजुरकर यांच्या नेतृत्वाखाली चेअरमन ,व्हा चेअरमन निवड पार पडली या आगोदर सुद्धा त्याच्या नेतृत्वाखाली या निवडी सुरळीतपणे पार पडल्या आहेत नवनिर्वाचित चेअरमन संतोष साबळे यांनी निवडीनंतर बोलताना सांगितले की, ‘‘संस्थेने माझ्यावर दाखविलेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. सभासदांचे हित, आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि संस्थेची आर्थिक प्रगती या चार सूत्रांवर भर देत पतसंस्थेला अधिक सक्षम आणि आदर्श संस्था बनविण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू. प्रत्येक सभासदाला विश्वास देणारा आणि विकासाभिमुख कारभार करण्याचा आमचा प्रयत्न असेल.‘‘ व्हाईस चेअरमन सुधीर उंडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ‘‘संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी चेअरमन आणि संचालक मंडळाच्या सहकार्याने काम केले जाईल. सभासदांच्या अडचणी तत्परतेने सोडविणे, संस्थेच्या योजनांचा अधिकाधिक लाभ तळागाळातील सदस्यांपर्यंत पोहोचविणे आणि आर्थिक व्यवहार अधिक गतिमान करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. संस्थेची विश्वासार्हता अधिक वृद्धिंगत करण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे काम करू.‘‘ नवनिर्वाचित सचिव गोटीराम मडके यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘‘संस्थेच्या दैनंदिन कामकाजात पारदर्शकता, शिस्त आणि उत्तरदायित्वाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. सभासदांना वेळेवर सेवा उपलब्ध करून देणे, कार्यालयीन कामकाज अधिक प्रभावी करणे आणि संस्थेची प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्यासाठी आधुनिक पद्धतींचा अवलंब केला जाईल. संचालक मंडळाच्या सहकार्याने संस्थेची प्रगती अधिक वेगाने घडवून आणू.‘‘

यावेळी जेष्ठ संचालक किशोर जेजुरकर यांनी प्रास्तविक केले ते म्हणाले कि यावेळी पतसंस्थेच्या उज्वल भवितव्यासाठी तसेच संस्थेची आर्थिक घडी अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. सभासदांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी लोकाभिमुख निर्णय घेण्यावर भर देण्याची अपेक्षाही व्यक्त त्यांनी व्यक्त केली तसेच पतसंस्था राबवित असलेल्या विविध योजनांची माहिती यावेळी त्यांनी दिली तसेच संस्थेच्या भविष्यातील विविध विकासकामांवर आणि आर्थिक नियोजनावरही चर्चा करण्यात आली. सभासदांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे, कर्ज वितरण प्रक्रिया सुलभ करणे, बचत वाढविण्यासाठी नवीन योजना राबविणे तसेच संस्थेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता राखणे यासंदर्भात सकारात्मक विचारमंथन करण्यात आले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व संचालक, सभासद आणि कर्मचारी यांना विश्वासात घेऊन सामूहिक नेतृत्वाच्या माध्यमातून काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. संस्थेच्या स्थापनेमागील उद्दिष्टे अधिक प्रभावीपणे पूर्ण करत सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन त्यांनी दिले. निवडीनंतर संस्थेच्या कार्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थितांनी एकमेकांचे अभिनंदन करत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आगामी काळात छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर ही सभासदाभिमुख, पारदर्शक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम संस्था म्हणून अधिक नावारूपास येईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला तसेच या निवडीचे जिल्हाउपनिबंधक कार्यलयातील महेश पालवे यांनी काम पाहिले.

## पंढरीच्या वाटेवर पुन्हा सज्ज सेवाभावाचा महायज्ञ

आवश्यक असल्याची मागणी त्यांनी पुन्हा केली. यासंदर्भात गेल्या दोन वर्षांपासून शासनाशी सातत्याने पत्रव्यवहार सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. नाशिक ते पंढरपूर दिंडी मार्गाच्या उभारणीसाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत असून, २२ जुलैपासून सुरू होणाऱ्या लोकसभेच्या अधिवेशनात हा प्रश्न पुन्हा उपस्थित करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गावर अनेक सेवाकेंद्रे कार्यरत असतात. मात्र नाशिक, नगर आणि उत्तर महाराष्ट्रातून येणाऱ्या दिंड्यांच्या मार्गावर अशा सुविधांची संख्या तुलनेने कमी असल्याने परीते येथे सेवा केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे लंके यांनी सांगितले.

यंदाच्या वारीतही सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेचा संदेश जपत लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी नीलेश लंके प्रतिष्ठान आणि आपला मावळा सामाजिक संघटना सज्ज झाली असून, सर्व तयारी पूर्ण झाल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

## संत वामनभाऊंच्या पालखीचे जामखेडला पहिले गोल रिंगण उत्साहात

करू लागले. यावेळी भाविकांनी एकच जय जयकार केला.

वारकरी परंपरेचे खेळिया प्रकरणातील अभंग झाले. यावेळी महंत विठ्ठल महाराज यांनी स्वतः अभंग गायले या अभंगाच्या चालीवर वारकरी वेगवेगळे खेळ खेळले. अनेक पुरुष व महिला भक्तांनी फुगडीचा आनंद लुटला. यावेळी जमादारवाडी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. रिंगण सोहळ्या दरम्यान या ठिकाणी नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली होती. जामखेड परिसरातून पंढरपूरला दररोज अनेक दिंड्या जातात. मात्र संत वामनभाऊ महाराज पालखी सोहळा हा सर्वात भव्य दिव्य सोहळा अनुभवास येतो. जमादारवाडी येथे होणारे रिंगण हे एकमेव आहे. त्यामुळे या परिसरातील भक्तगणांसाठी ही पर्वणीच ठरते. राज्यभरातून लाखो संख्येने वारकरी हे या सोहळ्यात सहभागी झाले आहेत. या रिंगण सोहळ्यानंतर पुढे जमादारवाडी येथे भोजन करून सारोळा येथे ही दिंडी मुक्कामी पोहोचली.